# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक १९.४.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ३ :-** राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या स्वनियंत्रण करिता ICT BASED TECHNOLOGY च्या अंमलबजावणी करिता जिल्हा नियोजन समिती मधुन शिर्ष क्र. २२१७ ए १४५ मधुन निधी मागणी बाबत.

**संदर्भ :-** १.शासन निर्णय क्र: स्वमअ-२०२१/प्र.क्र. १२(३)/नवि-३४, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२१

२. क्र. स्वमअ-२०२१/प्र.क्र. १६३/नवि-३४; दिनांक २१ जानेवारी, २०२२

**ठराव क्रमांक ३ :-** घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्या कामाच्या परिमाणकारक व्यवस्थापणा करीता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी माहिती तंत्रज्ञानवर आधारित प्रणालिचा (ICT BASED) वापर बंधनकारक असल्याचा निर्णय संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये घेण्यात आला आहे.

Indian Telephone industries Ltd. ( ITI Ltd.- Government of India undertaking) या कंपनीकडुन पुरविण्यात येणाऱ्या ICT BASED TECHNOLOGY वर आधारित सेवा व त्याचे दर सदर शासन निर्णयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ITI Ltd यांचेकडुन प्रणालीच्या खरेदी व अंमलबजावणी साठी स्थानिक स्वराज्य संस्था व ITI Ltd यांच्या दरम्यान थेट करारनामा प्रक्रिया पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांची असल्याबाबत संदर्भीय पत्र क्र. २ शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्र या अनुषंगाने शहरामध्ये असलेल्या No. of properties/Sweeping points/Liquid waste points च्या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षामध्ये तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार रु. ९,५४,४४,३००/- पहिल्या वर्षीचा खर्च येत आहे.

सदर विकास कामाच्या अंमलबजावणीसाठी व निधी मागणीसाठी मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तरी रु. ९,५४,४४,३००/- चा निधी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ या वर्षाकरीता शिर्ष क्र. २२१७ ए १४५ अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे बाबतच्या विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका
अमरावती

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका, अमरावती**